Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

**University of Mumbai**

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Enrol./ 17828/2013
Date : 16/04/2013.

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था.

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना, नावनोंदणी व पात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविताना त्रुटि राहु नयेत व विद्यार्थी तसेच महाविद्यालयांना असुविधा होवू नयेत या अनुषंगाने पात्रता प्रमाणपत्र व नावनोंदणी विभागाच्या सुचना कळविण्यात येत आहेत.

१) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये B.A., B.Com., B.Sc., B.M.M., B.S.W., B.Sc. (IT), B.Sc.(Nautical Science), B.Sc. (Home Science), B.Sc. (Aviation), B.Sc. (Hosp. Stud.), B.Sc. (Forensic Science), B.Sc. (Maritime Hospitality Studies), B.Com. (B & I), B.Com. (A & F), B.Com. (F & M) आणि B.M.S. अभ्यासक्रमांस प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज Online भरावयाचे आहेत.

२) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ चे नावनोंदणी अर्ज सादर करताना विद्यापीठाचे परिपत्रक क्र.नं.नावनोंदणी / १५६८ of २०११ दिनांक १४ जुलै, २०११ आणि क्र.नं.नावनोंदणी / २८१ of २०१२ दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२, क्र.नं.नावनोंदणी / ११०३ of २०१२ दिनांक १० मे, २०१२ व क्र.नं.पात्रता / ३६५७ of २०१२ दिनांक २६ नोव्हेंबर, २०१२ या परिपत्रकांचे महाविद्यालयांनी काटेकोर पालन करावे. (विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वरील सर्व परिपत्रके उपलब्ध आहेत.)

३) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ प्रत्येक विद्यार्थ्याला महाविद्यालयांनी प्रवेश हा तात्पुरता (Provisionally) द्यावयाचा आहे. प्रवेश विद्यापीठाने अंतिम केल्यावरच विद्यार्थ्याचा महाविद्यालय प्रवेश अंतिम होईल.

४) Online अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज विद्यापीठात सादर करताना विद्यार्थ्यांच्या अर्जाची यादी खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे नावांतील Alphabetically सादर करावी.

| Sr. No. | Elig./Enrol.Reg.Form Number | Name of the Students | Percentage | Caste |
|---|---|---|---|---|

## नावनोंदणी विभाग

१) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये B.A., B.Com., B.Sc., B.M.M., B.S.W., B.Sc. (IT), B.Sc.(Nautical Science), B.Sc. (Home Science), B.Sc. (Aviation), B.Sc. (Hosp. Stud.), B.Sc. (Forensic Science), B.Sc. (Maritime Hospitality Studies), B.Com. (B & I), B.Com. (A & F), B.Com. (F & M) आणि B.M.S. अभ्यासक्रमांस प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज फक्त MKCL च्या ई-सुविधा मार्फतच विद्याशाखा निहाय आवश्यक त्या कागदपत्रासह नावनोंदणी विभागात सादर करावयाचे आहेत.

..२/-

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in
No. Enrol./
Date :_______________ 20



२) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून वरील अभ्यासक्रमांचे Online Admission होणार आहेत याची सुचना महाविद्यालयांनी आपल्या सुचना फलकावर लावावी.

३) वरील अभ्यासक्रम वगळता उर्वरीत जे अभ्यासक्रम MKCL च्या पोर्टलवर Online नाहीत, त्यांचे अर्ज मॅन्युअली भरुन आवश्यक ती कागदपत्रे जोडुन नावनोंदणी विभागात दिलेल्या वेळापत्रकानुसारच जमा करावेत.

४) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी UGC च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रवेश समिती स्थापन करावी. सदर प्रवेश समितीस अभ्यासक्रमाच्या अर्हतेची माहिती असणे आवश्यक आहे, जेणे करुन चुकीचे प्रवेश देऊन त्याचा त्रास विद्यार्थ्यांस होणार नाही, तसेच कोर्ट केसेस होणार नाहीत. यासाठी शैक्षणिक अर्हता या विद्यापीठाच्या संकेत स्थळावर www.mu.ac.in उपलब्ध आहेत. तसेच ज्या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक अर्हता महाराष्ट्र शासन किंवा संबंधित शिखर संस्था यांनी निश्चित केलेल्या असल्यास त्याची माहिती प्रवेश समितीने करुन घ्यावयाची आहे.

५) मागील शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नावनोंदणी व पात्रतेसाठी महाराष्ट्र शासन परिपत्रक अवलोकनी घेता विद्यार्थ्यांची मुळ गुणपत्रके व प्रमाणपत्रेही विद्यापीठाकडे पाठवायची नसून त्याची संपुर्ण छाननी व तपासणी प्रवेश समितीने करुन प्राचार्यांनी / प्रवेश समितीचे Coordinator यांनी साक्षांकित केलेल्या त्यांच्या प्रती विद्यापीठाकडे पाठवावयाच्या आहेत. गुणपत्रके व प्रमाणपत्रे याबाबत कोणत्याही त्रुटी असल्यास संबंधीत प्रवेश समिती त्यास जबाबदार राहिल.

६) महाविद्यालयाने अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

७) नविन सुरु झालेल्या महाविद्यालयाने Online ई-सुविधा बाबत MKCL शी संपर्क साधुन पुढील योग्यती कार्यवाही करावी.

८) अभियांत्रिकी औषध निर्माण शास्त्र, अध्यापन शास्त्र (B.Ed.) यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची नावनोंदणी अंतिम करण्यासाठी प्रवेश नियंत्रण समितीचे पत्र व DTE ची यादी महाविद्यालयाने वेळेत सादर करणे गरजेचे असते, परंतु अद्याप काही महाविद्यालयांनी ती सादर केलेली नाही. तरी सदर महाविद्यालयांनी सदरच्या प्रलंबीत याद्या ३० जुलै, २०१३ पर्यंत विद्यापीठास सादर करावयाच्या आहेत, जेणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०१२-१३ च्या नावनोंदणी अंतिम करणे सुलभ होईल. अन्यथा विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही, याची कृपया नोंद

..३/-

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

Enrolment Section
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in
No. Enrol./
Date :_______________ 20



घ्यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रथम सत्रांच्या परिक्षा आरंभ होण्यापूर्वी किमान १५ दिवस आधी सदरच्या याद्या सादर करावयाच्या आहेत, तरी महाविद्यालयांनी सदरच्या याद्या त्वरित उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही महाविद्यालय स्तरावरून करावयाची आहे.

९) विद्यापीठाच्या नावनोंदणी विभागामध्ये नावनोंदणी अर्ज स्विकारावयाचे वेळापत्रक संकेत स्थळावर ठेवण्यात येईल. त्यानुसारच नावनोंदणी अर्ज जमा करावेत. त्यामुळे महाविद्यालयांना असुविधा होणार नाही.

१०) Online द्वारे नावनोंदणी करताना विद्यार्थ्याने त्याच्या गुणपत्रिकेवरील नावच अर्जामध्ये टाईप करावे. त्यामध्ये विसंगती असणार नाही याची काळजी घ्यावी. नावात बदल असल्यास योग्यतो पुरावा सोबत जोडावा (उदा. विवाह दाखला / महाराष्ट्र शासन राजपत्र) व याची पडताळणी महाविद्यालयाने करूनच अर्ज विद्यापीठात सादर करावेत.

११) विद्यापीठाकडुन व शासनाकडुन मंजुर असलेल्या अभ्यासक्रम / तुकडी / विद्यार्थी संख्येनुसारच (Intake Capacity) विद्यार्थी प्रवेशीत करावे व मंजुर विद्यार्थी संख्येप्रमाणेच अर्ज पाठवावेत. [मंजुर संख्येपेक्षा ज्यादाचे विद्यार्थी प्रवेशास विद्यापीठाने / शासनाने (विद्यार्थी संख्येवाढ) त्याच शैक्षणकि वर्षास मंजुरी दिली असल्यास त्याची मान्यतेची साक्षांकित प्रत अर्जासोबत पाठवावी.] अन्यथा नावनोंदणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

१२) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा डाटा अपलोड करताना एकाच विद्यार्थ्यांचा डाटा पुन्हा-पुन्हा अपलोड होणार नाही याची खात्री करावी व डाटा रजिस्टर झाल्याशिवाय त्याची प्रिंट काढू नये. जेणेकरून कोणतीही समस्या उद्भवणार नाही.

१३) महाविद्यालयाने अर्ज अपलोड केल्यानंतर ते सर्व अपलोड झाले की नाही व ते पोर्टलवर रजिस्टर झाले की नाही याची खात्री करून नावनोंदणी यादी तयार करण्यात यावी. अर्ज विद्यापीठात जमा करण्यापुर्वी यादीतील विद्यार्थी संख्या व अर्जांची संख्या समान असल्याची खात्री करावी.

१४) डाटा अपलोड केल्यानंतर विद्यार्थ्यांची यादी Alphabetical प्रमाणे देणे गरजेचे आहे व त्यांच्या सोबत MKCL नावनोंदणी अर्जही तसेच लावलेले असावेत (विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयातील रोल नंबरप्रमाणे नसावी) अन्यथा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

१५) नावनोंदणी फी भरतेवेळी फक्त नावनोंदणीचीच फी भरण्यात यावी. ई-सुविधाची फी रु. ५०/- प्रमाणे कॉम्प्युटर युनिट रुम नं.९ दुरस्थ शिक्षण विभाग येथे भरण्यात यावी. नावनोंदणी फी व ई-सुविधाची फी एकत्रितपणे भरण्यात येऊ नये (जमेची शिर्षके स्वतंत्र आहेत.)

..४/-

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in
No. Enrol./
Date :_______________ 20



## पात्रता व स्थलांतर विभाग

१) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये B.A., B.Com., B.Sc., B.M.M., B.S.W., B.Sc. (IT), B.Sc.(Nautical Science), B.Sc. (Home Science), B.Sc. (Aviation), B.Sc. (Hosp. Stud.), B.Sc. (Forensic Science), B.Sc. (Maritime Hospitality Studies), B.Com. (B & I), B.Com. (A & F), B.Com. (F & M) आणि B.M.S. अभ्यासक्रमांस प्रवेश घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना Online Eligibility देणेबाबत निर्णय झाल्याने विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज स्वतंत्रपणे पाठविण्याची आवश्यकता नाही. सदर विद्यार्थ्यांनी MKCL च्या ई-सुविधा मार्फत नावनोंदणी अर्ज महाविद्यालयाने या विभागास विद्याशाखा निहाय (Faculty wise) सादर करावेत, अर्ज सादर करताना पात्रता व नावनोंदणी शुल्क स्वतंत्रपणे परंतू त्याचवेळी भरावे. सदर विद्यार्थ्यांना Eligibility प्रमाणपत्र देण्यात येणार नसून PRN नंबर दिला जाईल.

२) उपरोक्त पात्रता क.(१) मधील अभ्यासक्रम वगळून उर्वरित अभ्यासक्रमाचे छापील पात्रता अर्ज व नावनोंदणी अर्ज नियमाप्रमाणे स्वतंत्र परंतू विद्याशाखा निहाय (Faculty wise) महाविद्यालयामार्फत पाठवावयाचे आहेत.

३) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून पात्रता प्रमाणपत्र विभागास मुळ गुणपत्रके / मुळ दस्तावेज पाठवावयाचे नाहीत. सदर गुणपत्रकाचे / दस्तावेजाचे साक्षांकित प्रती ह्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीने (प्रत्येक प्रतीवर) पाठवावयाच्या आहेत.

४) फक्त परदेशी विद्यार्थ्यांचे / परदेशी बोर्डातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रतेसाठी महाविद्यालये विद्यापीठाकडे अर्ज सादर करतील व पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावरच महाविद्यालय विद्यार्थ्यांना तात्पुरता (Provisional) प्रवेश देतील.

५) द्वितीय वर्ष (पदवीक उत्तीर्ण होवून प्रवेश घेवू इच्छिणा-या विद्यार्थी व्यतिरिक्त) किंवा पुढील कोणत्याही वर्षास प्रवेश घेवू इच्छिणा-या इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रथम विद्यापीठाकडून तात्पुरते पात्रता प्रमाणपत्रासाठी विद्यापीठाकडे परस्पर अर्ज करावयाचा आहे व त्यांना तात्पुरते प्रमाणपत्र मिळाल्यावरच महाविद्यालयांनी प्रवेश द्यावयाचा आहे. तसेच पदवीका धारण करुन द्वितीय वर्षात व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना पात्रता प्रमाणपत्र आवश्यक असून ते महाविद्यालयामार्फत अर्ज सादर करतील.

६) पात्रता अंतिम करण्यासाठी (Confirmation) महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविताना विद्यार्थ्यांची यादी ही PNS च्या / DTE च्या / बोर्डाच्या / विद्यापीठाच्या Verification यादीप्रमाणे (Sequence प्रमाणे) सादर करावी, तसेच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना मिळालेले PRN नंबर सादर करणे आवश्यक आहे.

..५/-

Tel. No. : 2654 3300
2654 3000 / 2653 0280
2654 3214
Extn. : 3214

University of Mumbai

**Enrolment Section**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
First Floor, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Enrol./
Date :_______________ 20



७) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून सर्व महाविद्यालयांनी प्रवेश हे तात्पुरते (Provisional) द्यावयाचे आहेत. विद्यार्थ्यांची नावनोंदणी अंतिम झाल्यावरच प्रवेश अंतिम करावेत.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देणे व तसेच त्यांची नावनोंदणीची व पात्रतेची माहिती विभागाकडे पाठविताना वरील उपरोक्त बाबीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सदर कार्यवाही नसलेले नावनोंदणी / पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

उपकुलसचिव
(नावनोंदणी विभाग)